ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख २९ ऑगस्ट, १९५१ अंक ३५

## विविध माहिती

**शब्दकोडीं सोडविण्यापेक्षा हें कोडें सोडवा**—तांत्रिक शिक्षणाची आवश्यकता हल्लीं सर्वमान्य झाली आहे. पण, दिल्ली एम्प्लॉयमेंट एक्सचेंजकडे आलेल्या बेकारांच्या अर्जांत पुढील तंत्रज्ञ आहेत. एंजिनिअर जागा ७, अर्ज ६२; त्यापैकीं कित्येकांना परदेशी पदव्या व भरपूर अनुभव आहे. ३२ डॉक्टरांचे अर्ज आहेत. संशोधकांच्या २ शिष्यवृत्त्यांसाठीं २८ अर्ज आले आहेत. वकील, प्राध्यापक व कारकून ह्यांचे अर्ज पुष्कळ व जागा नाहींत अशी परिस्थिति आहे.

**विमान-कंपनीचें उत्पन्न**—१९५० च्या पहिल्या सहा महिन्यांत ट्रॅन्स वर्ल्ड एअरलाइन्स ह्या कंपनीला २६,०३,००० डॉलर्स उत्पन्न झालें. ह्याच काळांत गेल्या वर्षी १०,२९,००० डॉलर्स उत्पन्न झालें होतें. फेडरल सरकारचा प्राप्तीवरील कर म्हणून कंपनीनें २४,३४,००० डॉलर्स भरले. जुनीं विमानें रद्द करून त्यांच्या जागीं अधिक मोठीं व जलद जाणारीं विमानें कंपनीनें वापरलीं, त्यामुळें कंपनीला अधिक नफा झाला, असें कंपनीच्या अध्यक्षांचें मत आहे.

**पिकांना माकडांचा धोका**—अमेरिकेच्या परराष्ट्रीय संबंध कमिटीनें असें मत व्यक्त केलें आहे कीं भारतामधील पिकांना माकडांचा फार मोठा धोका आहे. प्रत्येक माकड रोज १० सेंट किंमतीच्या धान्याचा नाश करतें असा अंदाज कमिटीनें केला आहे. मि. होरेस होल्म्स ह्या तज्ज्ञाची कमिटीपुढें साक्ष झाली. ते म्हणाले कीं कांहीं खेडगांवांत माकडें धरण्यासाठीं प्रयत्न करण्यांत येतात. परंतु ह्या कामीं लावलेलीं माणसें माकडांना न मारतां पकडून दुसऱ्या गांवीं नेऊन सोडून देतात.

**जगांतील कापसाचें उत्पादन**—१९५१ सालच्या जगांतील कापसाच्या पिकाचा अंदाज अमेरिकेच्या शेती-विषयक आंकडे गोळा करणाऱ्या संस्थेनें केला आहे. ह्या अंदाजाप्रमाण, चालू सालीं कापसाचें उत्पादन पूर्वीच्या कोठच्याहि सालापेक्षा अधिक होईल. १९३७ सालचें कापसाचें उत्पादन मात्र ह्याला अपवाद आहे. १९३७ सालीं कापसाच्या ३,८३,००,००० गांठी पिकल्या होत्या. त्याच्या खालोखाल १९५१ सालच्या पिकाचा क्रम असेल.

**सरदार पटेल स्मारक फंड**— अहमदाबाद गिरणी-मालक संघाच्या सभासद असलेल्या गिरण्यांनीं सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या स्मारक फंडासाठीं ५,३०,००० रुपये वर्गणीदाखल दिले आहेत. बिगर सभासद गिरण्या ६७,००० रुपये देतील असें कळतें.

**कत्तल झालेल्या गुरांच्या रक्ताचें खत**— कानपूरच्या म्युनिसिपालिटीनें कत्तलखान्यांत कापल्या जाणाऱ्या गुरांच्या रक्तापासून एक प्रकारचें कोरडें खत तयार करण्याची योजना मंजूर केली आहे. ह्यासाठीं तज्ज्ञ नोकरवर्ग व यांत्रिक अवजारें वापरण्यांत येणार आहेत. खताचा उपयोग अधिक धान्य पिकविण्यासाठीं करण्यांत येणार आहे. आतांपर्यंत सरकारला अशा प्रकारचें ४०० मण खत पुरविण्यांत आलें आहे.

**ब्रिटनचा एंजिनिअरिंगचा धंदा**—ब्रिटनच्या एंजिनिअरिंगच्या उद्योगधंद्यांत काम करणाऱ्या २५ लाख कामगारांनीं ह्या व्यवसायाचें राष्ट्रीयीकरण करण्यांत यावें अगर त्यावर नियंत्रण ठेवण्यांत यावें असें सुचविलें आहे. विमानांचे कारखाने, कोळशाच्या खाणींसाठीं लागणाऱ्या यंत्रांचे कारखाने, सामुद्रिक एंजिनिअरिंग, वगैरे धंद्यांचें संपूर्ण राष्ट्रीयीकरण करण्यांत यावें अशी मागणी करण्यांत आली आहे.

**बंगलोर येथील टेलिफोनचा कारखाना**—बंगलोर येथील टेलिफोनच्या कारखान्यांत १९५२ सालअखेर संपूर्ण टेलिफोन्स तयार होतील, असें समजतें. कारखान्याची उत्पादनक्षमता सर्वची सर्व वापरण्यांत येऊं लागल्यावर दरवर्षी ५०,००० टेलिफोन्स तयार होऊं शकतील. टेलिफोन्स व इतर साहित्य मिळून सुमारें २३/४ कोटी रुपयांचा माल तयार होईल.

**भारताला जर्मन कारखाने मिळाले**—जर्मनीकडून नुकसानभरपाई म्हणून भारताला पुढील स्वयंपूर्ण कारखाने मिळाले आहेत. एक मेथानॉलचा कारखाना, एक टी. एन्. टी. चा कारखाना, एक ग्लिसरिनचा कारखाना आणि एक सूक्ष्म यंत्रें तयार करण्याचा कारखाना. सर्व कारखाने चालू स्थितींत आहेत.

**भारतीय अनुबोधपटाला बक्षीस**—व्हेनिस येथें शास्त्रीय माहिती पुरविणाऱ्या अनुबोधपटांचें एक प्रदर्शन नुकतेंच भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शनांत राजस्थानवरील अनुबोधपटाला बक्षीस देण्यांत आलें. ब्रिटिश अनुबोधपटांनाहि बक्षिसें मिळालीं. हिंवतापाच्या डांसाचें जीवन दाखविणाऱ्या एका ब्रिटिश चित्रपटाला एक बक्षीस देण्यांत आलें.

**लेनिनच्या जयंतीच्या दिवशींसुद्धां काम**—रशिआंत लेनिनच्या जयंतीचा दिवस आतापर्यंत सार्वजनिक सुटीचा म्हणून पाळला जात असे. परंतु ह्यापुढें त्या दिवशीं नेहमींप्रमाणें काम करण्यांत येणार आहे. हा बदल कामगारांच्या इच्छेप्रमाणेंच करण्यांत आल्याचें रशिअन सरकारनें जाहीर केलें आहे.

## आर्थिक घडामोडी ( १९३०–५० )*

गोखले अर्थशास्त्र नि राजकारण संशोधन संस्थेचें मराठींतील हें तिसरें प्रकाशन होय. पूर्वीच्या दोन प्रकाशनांप्रमाणें, संस्थेनें केलेल्या आर्थिक पहाणीच्या मूळ इंग्रजी अहवालाचें हें भाषांतर नाहीं, किंवा वरील विषयावर मुद्दाम लिहिलेला असा ग्रंथ नाहीं. ह्या दृष्टीनें प्रस्तुत पुस्तक संस्थेच्या आतांपर्यंतच्या इंग्रजी नि मराठी प्रकाशनांपेक्षां निराळ्या प्रकारचें आहे, असें म्हणतां येईल. संस्थेचे संचालक नि सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रो. ध. रा. गाडगीळ व त्यांचे मदतनीस प्रो. नी. वि. सोवनी यांनीं वरील काळांत घडलेल्या महत्त्वाच्या अशा निरनिराळ्या आर्थिक घटनांवर लिहिलेले व त्या त्या वेळीं मासिकांत अगर दैनिकांत प्रसिद्ध झालेले असे २० लेख ह्या ग्रंथांत संकलित करण्यांत आले आहेत. लेखांची मांडणी तीन भागांत करण्यांत आली आहे. पहिल्या भागांत प्रो. गाडगीळ यांनीं १९३० ते १९३९ पर्यंत लिहिलेले सहा लेख देण्यांत आले आहेत. दुसऱ्या भागांत १९३९–५० पर्यंतच्या काळांतील घडामोडींसंबंधींचे लेख घातले असून तिसऱ्या भागांत कांहीं संकीर्ण विषयावरील ३ लेखांचा संग्रह करण्यांत आला आहे. प्रस्तुत ग्रंथांत प्रो. गाडगीळ यांचे ८ लेख व २ भाषणें असून बाकीचे १० लेख प्रो. सोवनी यांचे आहेत. संग्रहित केलेल्या लेखांचें व भाषणांचें विषयवार वर्गीकरण करावयाचें झाल्यास स्थूल मानानें तें पुढीलप्रमाणें करावें लागेलः– चलन, हुंडणावळ, आंतरराष्ट्रीय व्यापार, इ. ९ लेख, नियोजन व आर्थिक धोरण ३, अन्नधान्याचा प्रश्न ४, सहकार १, लोकसंख्येचा प्रश्न २.

राजकीय, सामाजिक वगैरे विषयांवरील कांहीं मोठ्या लोकांच्या लेखांचे संग्रह करण्याचा प्रघात नवा नाहीं. ज्यावेळीं असे लेख प्रसिद्ध झालेले असतात ते त्यावेळच्या परिस्थितीस अनुलक्षून व त्या त्या वेळीं उपलब्ध असलेल्या माहितीवरून पुढच्या काळाचा अंदाज करून लिहिलेले असतात. त्यामुळें, कांहीं वर्षांनीं ते वाचल्यास त्यांतील कांहीं गृहीत कृत्यें व भाकितें चुकीचीं वाटण्याचा संभव असतो. अर्थशास्त्रीय प्रासंगिक लिखाणांत तसें घडण्याची शक्यता ही नेहमींच जास्त असते. हें एक अटळ न्यूनत्व गृहीत धरल्यास, प्रस्तुत पुस्तक हें ऐतिहासिक दृष्ट्या मनोरंजक ठरेल; एवढेंच नव्हें तर तें अतिशय उद्बोधक नि मार्गदर्शक ठरल्याशिवाय राहणार नाहीं. कारण, लेखांतील प्रतिपाद्य विषयांचें विश्लेषण, विवेचन नि मांडणी शक्य तितक्या सुबोध रीतीनें पण शास्त्रीय पार्श्वभूमीवर करण्यांत आली आहे. लेखांच्या विषयांकडे दृष्टि टाकल्यास, त्यांपैकी बरेचसे विषय अद्याप अतिशय महत्त्वाचे व अनिर्णित राहिले असल्याचें दिसून येईल. त्यासंबंधींचें मत बनवितांना प्रस्तुत पुस्तकांतील संबंधी लेख चाळणें केव्हांही उपयुक्त ठरेल यांत शंका नाहीं. प्रो. गाडगीळ यांचीं 'आपलें आर्थिक धोरण व राजकीय भवितव्य' व 'महाराष्ट्र विभाग सहकारी परिषदेचें अध्यक्षीय भाषण' हीं दोन भाषणें ह्याबाबत उदाहरणादाखल देतां येतील. पुस्तकांतील इतरही लेख माहितीपूर्ण व विचारांना चालना देणारे असेच आहेत. अशा तऱ्हेच्या वाचनीय लेखांचा संग्रह करून मराठी वाचकांना तो उपलब्ध करून दिल्याबद्दल गोखले अर्थशास्त्र नि राजकारण संशोधन संस्थेचें करावें तितकें अभिनंदन थोडेंच ठरेल. पुणें विद्यापीठाच्या संस्थापनेमुळें मराठी माध्यमास आलेलें महत्त्व लक्षांत घेतां, संस्थेनें ह्यापुढें मराठींत शास्त्रीय विषयावरील अशींच उपयुक्त पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा उपक्रम चालू ठेवावा असें शेवटीं सुचवावेसें वाटतें. कारण, संस्थेच्या बहुमोल कार्यांचा फायदा बहुजन समाजास त्यामुळें करून घेतां येईल.

रा. गो. का.

* लेखकः- प्रो. ध. रा. गाडगीळ व प्रो: नी. वि. सोवनी
प्रकाशकः– गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्था, पुणें ४
प्रकाशन ३ रें – १९५१. पृष्ठसंख्या २८७, किंमत आठ रुपये.

### पैसे पाठविण्याचे रिझर्व्ह बँकेचे दर उतरले

रूरल बँकिंग चौकशी कमिटीच्या सूचनेस अनुसरून रिझर्व्ह बँकेनें व्यापारी बँका, सहकारी बँका व सोसायट्या आणि सावकार ह्यांचेकडून, पैसे पाठविण्यासाठी कमी दरानें आकार घेण्याचें ठरविलें आहे. १ सप्टेंबर, १९५१ पासून, रिझर्व्ह बँकेच्या कचेऱ्या, इंपीरिअल बँकेच्या शाखा आणि रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्याच्या थैल्या ठेवणाऱ्या ट्रेझऱ्या व सबट्रेझऱ्या ह्यांचे द्वारा सवलतीच्या दरानें पैसे पाठविण्याची व्यवस्था होईल.

| | सध्याचा दर | नवा दर |
|---|---|---|
| ५,००० रु. पर्यंत | १/१६% (किमान १ रु) | १/३२% (किमान १ रु.) |
| ५,००० रु. वर | १/३२% (किमान २ रु. २ आ.) | १/६४% (किमान १ रु. ९ आ.) |

रिझर्व्ह बँकेच्या कचेऱ्यां व एजन्सीज ह्यांचेमार्फत शेड्यूल्ड बँकांना असलेल्या सवलती वाढविण्यांत येत आहेत. इंपीरिअल बँकेच्या कोणत्याहि खात्यांत शेड्यूल्ड बँक पैसे वर्ग करूं शकेल– जेथून पैसे पाठविण्याचे तेथें शेड्यूल्ड बँकेची कचेरी वा खातें असो, वा नसो. रिझर्व्ह बँकेंत खातें ठेवणाऱ्या राज्य सहकारी बँकांनाहि ही सवलत मिळेल.


# दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
## —लि., सांगली.—

स्थापना १९२७

मुख्य कचेरी : हायस्कूल रोड, सांगली

तारेचा पत्ता RAYAT BANK फोन नं. ३०

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | २,४९,२०० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | २,१०,५९० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,४३,०९७ |
| खेळतें भांडवल | रु. | १७,००,००० चे वर |

शाखा

(१) जत (२) मिरज (३) तासगांव

बँकेची ज्युबिली १९५२ सालांत आहे.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

रा. बा. आरवाडे, B. A., LL. B. चेअरमन

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. २९ ऑगस्ट, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे.
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## औद्योगिक भांडवल पुरवठ्याची परिस्थिति

### इं. फि. कॉर्पोरेशनचा अहवाल

भारतांतील औद्योगिक कंपन्यांच्या भांडवलविषयक गरजा आणि अडचणी ह्यांचा एकत्रित व तुलनात्मक विचार इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या स्थापनेमुळें शक्य झाला आहे. कॉर्पोरेशनचा ३० जून, १९५१ अखेरचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे, तो त्यामुळें पुष्कळच उद्‌बोधक आहे. "शक्य ती मदत कॉर्पोरेशननें केली आहे, परंतु एकंदर परिस्थिति चिंताजनक आहे. पैशाची तंगी आणि वाढत्या किंमती ह्यामुळें भांडवलाचा पुरवठा मर्यादित झाला आहे. त्याचा चालू उद्योगधंद्यांच्या उत्पादनावर, आणि आशेनें वाट पाहिली जात आहे अशा कारखान्यांच्या वाढीवर विपरीत परिणाम होण्याची भीति आहे. कित्येक कारखान्यांना आवश्यक तें ज्यास्त खेळतें भांडवल मिळणें कठिण जात आहे; आणि जे उत्पादनशक्ति वाढविण्यासाठीं नवीं यंत्रसामुग्री बसविण्याचा विचार करीत आहेत, अशांना आपल्या योजना स्थगित करण्याची पाळी येत आहे," असा अभिप्राय कॉर्पोरेशनच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीं आपल्या रिपोर्टांत व्यक्त केला आहे.

कॉर्पोरेशनकडे कर्जासाठीं येणाऱ्या अर्जांची संख्या घटत चालली आहे. १९४८-४९ मध्यें तिचेकडे १० कोटी, ३३ लक्ष रुपयांचे ९५ अर्ज आले होते; १९४९-५० मध्यें ८ कोटी, ७६ लक्ष रुपयांचे ६५ अर्ज आले होते आणि १९५०-५१ मध्यें ५ कोटी, ४८ लक्ष रुपयांचे ४५ अर्ज आले. आर्थिक परिस्थितीमधील फरक ह्या उतारास कारणीभूत आहे. १९४६ अखेरपर्यंत शेअर्स विकून भांडवल उभारणें अवघड नव्हतें. यंत्रसामुग्री व कच्चा माल ह्यांची किंमत चढली व मजुरी वाढली, तेव्हां बहुतेक कंपन्यांना त्यांच्या योजना मूळ जमविलेल्या भांडवलानें पुऱ्या करणें अशक्य झालें. इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना ह्याच सुमारास झाली आणि तिच्या मदतीचा पुष्कळ कंपन्यांना फायदा झाला. त्यानंतर मात्र यंत्रसामुग्री आणि कच्चा माल मिळण्याच्या अनिश्चिततेमुळें आणि खेळत्या भांडवलाच्या वाढत्या नडीमुळें नवीन योजना पुढें आल्या नाहींत.

भारतानें कित्येक मालाची आयात जवळ जवळ बंद केली आणि आयात होणाऱ्या कित्येक मालावर जबर संरक्षक जकात बसविली, तेव्हां भारतांतील कारखान्यांची स्थिति सुधारून ते थोड्याच अवधींत उत्कर्ष पावतील अशी अपेक्षा होती. परंतु, त्यांना अनेक अडचणी सोसाव्या लागल्या. कपास, कापड, ताग, साखर, सिमेंट व पोलाद हे भारताचे प्रमुख धंदे. त्यांपैकीं पहिल्या दोघांना कच्चा माल पुरविणारीं प्रमुख क्षेत्रें पाकिस्तानांत समाविष्ट झालीं. साखरेवरील नियंत्रण थोडें ढिलें केल्यामुळें साखर उत्पादन थोडेसें वाढलें. सिमेंटचें उत्पादन एकूण उत्पादनक्षमतेपेक्षां फारसें कमी नव्हतें. पोलादाचें उत्पादन वाढलें तरी पोलादाची आयात बरींच कमी झाली आणि कित्येक नव्या कारखान्यांच्या वाढीमुळें मागणी वाढल्यामुळें एकंदर पुरवठा-मागणींतील अंतर कायमच राहिलें. इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या कारखान्यांना आयात कच्चा माल व सुटे भाग ह्यांच्या तुटवड्यास तोंड द्यावें लागत आहे. सरकारनें युद्धकाळांत स्थापन झालेल्या उद्योगधंद्यांना संरक्षण दिल्यानें व नवीन उद्योगधंद्यांना संरक्षण देऊन त्यांच्या स्थापनेस प्रोत्साहन दिल्यानें, देशांतील किमान मागणी तरी पुरी पडणें शक्य झालें आहे.

हिंदी उद्योगधंद्यांना भांडवलाचा तुटवडा आतां फारच तीव्रतेनें भासूं लागला आहे. एकूण उलाढालीशीं खेळत्या भांडवलाचें प्रमाण अत्यल्प असल्यामुळें बँकांकडे कारखान्यांची कर्जाची मागणी अतिशय वाढली, परंतु बँकां त्यांच्या मदतीस जाणें नेहमीच शक्य नव्हतें व नाहीं. किंमतींत झालेली वाढ, कच्च्या मालाचा योग्य किंमतीस सतत पुरवठा होण्याची अशक्यता, जरूर त्या क्षणीं यंत्रसामुग्री व सुटे भाग मिळण्याची अडचण, कारखाने वेळेवर उभारले न जाण्याचे प्रसंग, इत्यादि गोष्टींमुळें उत्पादनक्षमता असूनहि प्रत्यक्ष उत्पादन मागें पडलेलें दिसून येतें. कॉर्पोरेशनला हिंदी उद्योगधंद्यांच्या परिस्थितीचा व अडचणींचा दैनंदिन परिचय असल्यानें त्याचें प्रतिबिंब प्रस्तुत रिपोर्टांत पडणें स्वाभाविक आहे.

कॉर्पोरेशनचा कर्जाचा दर सामान्यतः ५½% आहे, परंतु व्याज व मुद्दल वक्तशीर फेडल्यास ½% रिबेट दिला जातो. कॉर्पोरेशन स्वतः ३¼% नें पैसा उभारते. त्यामुळें, कॉर्पोरेशनजवळ बिनव्याजी अथवा अल्पव्याजी पैसा पडून राहिला तर त्यावर नुकसानच येतें. त्यामुळें, कॉर्पोरेशनच्या कर्जावरील व्याजाचा दर ५% खालीं जाण्याची शक्यता नाहीं. कित्येक कंपन्या मंजूर कर्जें लवकर उचलूं शकत नाहींत, त्यामुळेंहि अशी अडचण येते. अहवालाचे वर्षीं कॉर्पोरेशनला ३५ लक्ष, ८७ हजार रुपये उत्पन्न होऊन, व्याज भागवून व खर्च वजा जाता निव्वळ नफा ७,९३,६३७ रु. उरला. त्यांतून १ लक्ष रु. रिझर्व्ह फंडाकडे वर्ग केल्यावर ६,९३,६३७ रु. रहातात. ही रक्कम ५ कोटी रुपयांच्या शेअर भांडवलावर सरकारी हमीचें किमान २½% डिव्हिडंड देण्यास अपुरी असल्यानें सरकारकडे आवश्यक त्या ४,३१,३६३ रु. ची मागणी करण्यांत येईल.

---

### श्री. धोंडुमामा साठे ह्यांचा सत्कार

डेकन बँक्स असोसिएशन, पुणें या संस्थेचे अध्यक्ष श्री. धों. कृ. साठे यांना ६० वर्षें पूर्ण होऊन ते ६१ व्या वर्षांत पदार्पण करीत आहेत. त्या निमित्तानें संस्थेनें त्यांचा सत्कार शुक्रवार दि. ३१ ऑगस्ट १९५१ रोजीं श्री. नानासाहेब परुळेकर यांचे अध्यक्षतेखालीं सायंकाळीं ६॥ वाजतां भोर स्टेट बँकेच्या सभागृहांत करण्याचें ठरविलें आहे.

---

### गुडविल ॲशुरन्स बिल्डिंग

गुडविल ॲशुरन्स कं. लि. च्या गुडविल ॲशुरन्स बिल्डिंगचा उद्‌घाटन समारंभ शनिवार, ता. २५ ऑगस्ट रोजीं ना. गाडगीळ ह्यांच्या हस्तें झाला. वूलन मिल लेन, बाँबे ग्लास वर्क्स शेजारीं, दादर, मुंबई १४ येथें ही इमारत बांधण्यांत आली आहे.

## न्यूयॉर्क येथील शास्त्रज्ञांचा मेळावा

### डॉ. लिमये ह्यांची निवड

रानडे इन्स्टिट्यूट, कपिलाश्रम, रसायन निधि, इत्यादि संस्थांत संशोधन कार्य करणारे आणि "अर्थ"चे एक सहाय्यक डॉ. श्रीधर दत्तात्रय लिमये बी.ए. (ऑनर्स), पीएच्. डी., हे सोमवार ता. २७ रोजीं न्यूयॉर्ककडे विमानमार्गे रवाना झाले. ३ ते १३ सप्टेंबरपर्यंत, न्यूयॉर्क येथें अमेरिकन केमिकल सोसायटीच्या रजत महोत्सवानिमित्त शास्त्रज्ञांचा एक आंतरराष्ट्रीय मेळावा भरविण्यांत येत आहे. त्यास उपस्थित होण्यासाठी भारतांतील १० संशोधक निवडले आहेत, त्यापैकीं डॉ. लिमये हे एक आहेत. अमेरिकन केमिकल मेळाव्यासाठी सोसायटीनें मार्शल मदत घेणाऱ्या देशांतील २५० व आशियांतील ६० तरूण शास्त्रज्ञांना पाचारण केलें आहे. सर्व निमंत्रित शास्त्रज्ञ ४० वर्षांचे खालील वयाचे आहेत, हें वैशिष्ट्य नमूद करण्यासारखें आहे. हिंदी शास्त्रज्ञांच्या तुकडीचें नेतृत्त्व डॉ. मॅकबेन ह्यांचेकडे आहे. डॉ. लिमये हे त्यांचेच वडील, सुप्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ प्रो. द. बा. लिमये ह्यांच्या वृत्तीचे व परंपरेचे असल्याकारणानें, त्यांच्या नव्या अनुभवाचा फायदा महाराष्ट्रीयांस पुरेपूर मिळाल्याविना रहाणार नाहीं. डॉ. लिमये ह्यांना अमेरिकेंतील संशोधन–शाळांचें निरीक्षण करण्याची संधि मिळणार असून वेगवेगळ्या संशोधन शाळा त्यांना दाखविण्याची व्यवस्था आगाऊच करण्यांत आलेली आहे.

---

### आकडेशास्त्रासाठी प्रो. सोवनी अमेरिकेस निघाले

रॉकफेलर फौंडेशनच्या सहाय्यानें, आकडेशास्त्राचा अधिक खोल अभ्यास करण्यासाठी व प्रत्यक्ष अनुभव मिळविण्यासाठी गोखले इन्स्टिट्यूटचे प्रो. नी. वि. सोवनी हे गेल्या आठवड्यांत अमेरिकेस जाण्यासाठी निघाले.

---

### नव्या बँक ट्रायब्यूनलच्या कामास नोव्हेंबरमध्यें प्रारंभ

श्री. दिवाटिया यांच्या अध्यक्षतेखालीं नेमण्यांत आलेल्या नव्या बँक ट्रायब्यूनलच्या बैठकी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यांत सुरू होतील. बहुतेक बैठकी मुंबईसच झाल्या, तरी कलकत्ता, मद्रास व कानपूर येथेंहि कांहीं बैठकी होतील. बँकांकडे एकूण ३६ वादग्रस्त प्रश्न पाठविण्यांत आले आहेत. बँका आपल्या नोकरांना तीं सर्क्युलरें देतील. नोकरांनीं आपल्या मागण्या ट्रायब्यूनलकडे १५ सप्टेंबर, १९५१ पूर्वीं पाठविण्याच्या आहेत.

---

### श्री. साठे ह्यांचा सत्कार

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या संचालक मंडळाचे अध्यक्ष व पुण्यांतील एक सार्वजनिक कार्यकर्ते श्री धों. कृ. तथा धोंडूमामा साठे यांचे वयास दि. २०–८–५१ ला ६० वर्षे पूर्ण होतात. या प्रसंगानिमित्त बँकेचे संचालक व नोकरवर्ग यांचेतर्फे श्री साठे यांचा सत्कारसमारंभ बँकेचे ज्येष्ठ संचालक श्री. फ. दो. पदमजी यांचे अध्यक्षतेखालीं रविवार दि. २६–८–५१ ला साजरा करण्यांत आला. श्री. बापूसाहेब गुते, श्री. वा. पुं. वर्दे, श्री. ग. ल. हळवे, वगैरेंचीं त्यांच्या कार्याबद्दल माहिती देणारीं व त्यांस दीर्घ आयुरारोग्य चिंतणारीं भाषणें झालीं. अध्यक्षांचे हस्तें श्री. साठे यांस हार व बँकेचे नवीन इमारतीचें नमुनेदार मॉडेल समर्पण करण्यांत आलें. उत्तराच्या भाषणांत श्री. साठे यांनीं आपण जें कार्य केलें तें सर्वांच्या सहकार्याचें फळ आहे असें सांगितलें. शेवटीं अल्पोपहार होऊन हा गोड समारंभ संपला.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
ठेवी १ कोटीवर
हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.

## पैशाचा पुरवठा व त्याची वाढ

एकूण पैशाचा पुरवठा = जनतेजवळील चलन ( खेळत्या नोटा + खेळतीं नाणीं – सरकारी तिजोऱ्यांतील नोटा व नाणीं – शेड्यूल्ड, बिगर शेड्यूल्ड व सहकारी बँकांजवळील नोटा व नाणीं ) + शेड्यूल्ड बँका, बिगर शेड्यूल्ड बँका व सहकारी बँका ह्यांचीं डिमांड देणीं – शेड्यूल्ड बँकांचीं एकमेकांचीं डिमांड देणीं + रिझर्व्ह बँकेकडील ठेवी (मध्यवर्ती सरकारच्या आणि बँकांच्या ठेवी वगळून परंतु 'इतर सरकारी ठेवी' व 'इतर ठेवी' धरून ). ह्या व्याख्येप्रमाणें, बँका व मध्यवर्ती सरकार वगळून बाकीच्यांचे जवळील सर्वप्रकारचें विनिमयसाधन, म्हणजे एकूण पैशाचा पुरवठा असा अर्थ होतो.

### १९५०–५१ मधील वाढ

१९५०–५१ मध्यें अशा प्रकारच्या पैशाच्या पुरवठ्यांत ९९ कोटी रुपयांची वाढ झाली; १९४९–५० मध्यें १८ कोटींची व १९४८–४९ मध्यें ८४ कोटींची घट झाली होती. ९९ कोटींच्या वाढीपैकीं ८४% वाढ जनतेजवळील पैसा वाढून झाली आणि बाकीची १६% म्हणजे १५३/४ कोटींची वाढ ठेवींत भर पडल्यानें झाली. १९४८–४९ व १९४९–५० मध्यें पैशाच्या पुरवठ्यांत घट झाली, ती बहुतेक सर्व ठेवींतील उतारामुळेंच झालेली होती.

### वाढीची कारणमीमांसा

परराष्ट्रीय देण्याघेण्यांतील अनुकूल तफावतीमुळें रिझर्व्ह बँकेस स्टर्लिंगमधील ३८ कोटी रुपयांचें नवें येणें उपलब्ध झालें. १९४९–५० मध्यें रिझर्व्ह बँकेचें परराष्ट्रीय येणें ७३ कोटी रुपयांनीं कमी झालें होतें. १९५०-५१ मधील वाढलेल्या पैशाच्या पुरवठ्याचें हें महत्त्वाचें कारण आहे. दुसरें कारण म्हणजे बँकांनीं दिलेलीं मोसमी कर्जें मार्च, १९५१ अखेर १४२ कोटी रुपयांनीं वाढली; त्यापूर्वीच्या वर्षाची वाढ ६७ कोटी रुपयांची होती. तिसरें कारण म्हणजे रिझर्व्ह बँकेजवळील हिंदी सरकारी रोखे मार्च, १९५१ अखेर ६५ कोटी रुपयांनीं वाढलें; ह्यापूर्वीच्या वर्षाची तत्सम वाढ फक्त ६ कोटींचीच होती. रिझर्व्ह बँकेनें सरकारांना व 'इतरांना' दिलेल्या कर्जांतहि १९५०-५१ मध्यें तुलनात्मक दृष्ट्या वाढ आढळते.

---

## १० वर्षांची ट्रेझरी सें. डि. सर्टिफिकिटें

### पहिल्या दोन महिन्यांत ५३/४ कोटी जमा

भारत सरकारनें १ फेब्रुवारी, १९५१ पासून १० वर्षे मुदतीचीं ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकिटें विकण्यास प्रारंभ केला. ह्या सर्टिफिकेटांचा व्याजाचा दर ३१/२% कर माफ असून १० वर्षांनीं त्यांची परतफेड व्हावयाची आहे. एका वर्षाच्या मुदतीनंतर त्यांची रक्कम कांहीं डिस्कौंट कापून घेऊन परत मिळण्याची व्यवस्था आहे. १ फेब्रुवारी ते ३१ मार्च, १९५१ ह्या दोन महिन्यांत ह्या सर्टिफिकिटांच्या विक्रीचे ५ कोटी, ४८ लक्ष रु. जमा झाले. जॉइंट नांवावर १ कोटी, ८२ लक्ष रु. असून एकेका व्यक्तीच्या नांवावर १ कोटी, ६९ लक्ष रुपये आहेत. धर्मादाय संस्थांनीं ६ लक्ष रुपयांचीं व इतर संस्थांनीं १ कोटि, ९१ लक्ष रुपयांचीं सर्टिफिकिटें घेतलीं आहेत.


## नियोजन मंडळाच्या योजनेचें वास्तववादी स्वरूप

### उद्दिष्टांचा अपरिहार्य मर्यादितपणा

(भा. म. काळे)

नियोजन मंडळानें लोकमत अजमाविण्यासाठी प्रसिद्ध केलेली पंचवार्षिक योजना कांहीं दृष्टींनीं विशेष विचारार्ह व स्वागतार्ह आहे. याचें पहिलें मुख्य कारण म्हणजे ही योजना १९४३ च्या टाटा–बिर्ला योजनेप्रमाणें किंवा लोक–योजनेप्रमाणें डोळे दिपवून टाकणारी नसून पूर्णपणें व्यावहारिक स्वरूपाची, वास्तववादी व अगदी बेताचें उद्दिष्ट साधणारी आहे. योजनेच्या या वास्तववादी स्वरूपांतच योजनेच्या यशाचीं बीजें आहेत. सरकारलाहि गेल्या तीन–चार वर्षांत प्रत्यक्ष व्यवहारांत निर्माण झालेल्या अनेक अडचणींची पूर्ण जाणीव असल्यामुळें नियोजन मंडळानें वास्तवतेवर भर दिला आहे. ही योजना म्हणजे गेल्या वर्षी तयार करण्यांत आलेल्या कोलंबो योजनेंत जरूर ते फेरबदल करून तयार करण्यांत आलेली योजना आहे व आशिया खंडांतील मागासलेल्या देशांसाठी विकास योजना आखतांना ती मूळ भौगोलिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आधारावी अशी आशिया खंडासाठी नेमण्यांत आलेल्या विकास मंडळाची दृष्टि असल्यामुळें, नियोजन मंडळाची योजना व्यावहारिक स्वरूपाची आहे.

योजनेच्या वास्तववादी स्वरूपाचा विचार करतांना मनांत भरण्यासारखी पहिली गोष्ट म्हणजे शेती व पाटबंधारे यांसाठी बराच खर्च करूनहि हिंदला वर्षाला निदान तीस लक्ष टन धान्याची परदेशांतून आयात कांहीं वर्षें करावी लागेल, व सरकारनें स्वतःच्या संग्रहीं वेळप्रसंगीं उपयोगी पडण्यासाठी दहा लक्ष टन धान्याचा सांठा ठेवावा, ही सूचना होय. धान्याच्या बाबतींत लौकरच स्वयंपूर्ण बनणें अशक्य आहे. नियोजन मंडळाची दुसरी व्यावहारिक सूचना म्हणजे भरमसाट वाढत जाणाऱ्या लोकसंख्येकडे लक्ष वेधण्यांत आलें आहे व जनतेमध्यें लोकसंख्या मर्यादित राखण्याच्या दृष्टीनें जरूर तें प्रचारकार्य सरकारकडून केलें जावें ही होय. हिंदची लोकसंख्या गेल्या ५० वर्षांत दीडपट झाली आहे व लोकसंख्येच्या या वाढीच्या प्रमाणांतच हिंदी जनतेच्या दारिद्र्याची व खालावत जाणाऱ्या राहाणीच्या मानाचीं कारणें सांपडतात. कारण, शेती व उद्योगधंदे यांचें उत्पादन लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणांत मुळीच वाढत नाहीं. लोकसंख्येच्या वाढीच्या प्रश्नाकडे मंडळानें लक्ष वेधविलें आहे ही अत्यंत योग्य अशीच गोष्ट आहे. या योजनेनें पुढील पांच वर्षांच्या काळांत जनतेकडून सहकार्य, कष्ट व थोडासा आत्मयज्ञ यांची अपेक्षा केली आहे व एवढें करून १९५६ मध्यें जनतेला फक्त युद्धापूर्वीइतकेंच, म्हणजे १९३९ सालीं असलेलें जीवनमान प्राप्त करून घेतां येईल. याप्रमाणें कोणतेंहि भलतेंच डोळे दिपवून टाकणारें आमिष जनतेपुढें ठेवण्यांत आलें नसून फार तर १९३९ सालच्या परिस्थितीप्रत आपण येऊन पोहोचूं असें स्पष्टपणें बजावण्यांत आलें आहे. १९५६ पर्यंत पूर्ण सहकार्य सर्वांकडून मिळाल्यास ७० लक्ष टन जादा धान्य, २० लक्ष तागाच्या गांठी, १२ लक्ष कापसाच्या गांठी व ७ लक्ष टन गूळ इतकें अधिक उत्पादन शक्य होईल. मंडळाच्या योजनेचा मुख्य भर शेती, पाटबंधारे व रस्ते यांवर असून शेतीच्या बाबतींतलें उद्दिष्ट साधण्यासाठी प्रत्येक खेडेगांवांत सहकारी तत्त्वावर शेती करण्यांत यावी असें सुचविण्यांत आलें आहे. यांतहि गोष्टींत वास्तवताच दिसते. औद्योगिक विकासाच्या बाबतींत खाजगी धंद्यांना पूर्ण मुभा राहील असें


पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी

**दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.**

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

★ प्रमाणशीर खर्चांत मिळेल असें फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★

सर्वत्र प्रतिनिधी पाहिजेत.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवीवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिशीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७१८. तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay

कमिशनचें मत आहे. या मंडळाच्या अहवालावरून आणखी एक गोष्ट ठळकपणें स्पष्ट होते, ती म्हणजे हिंदुस्थानचें दारिद्र्य. हिंदची आर्थिक परिस्थिति इतकी कमकुवत बनली आहे कीं पांच वर्षांच्या कार्यक्रमानें हिंद सरासरी जगावयाला समर्थ होईल व त्यानंतर कांहीं प्रगति करणें शक्य होईल. आजच्या काळांत वास्तववादी कठोर सत्य दाखविणारा आराखडा मंडळानें तयार केला आहे.

परंतु, मंडळानें सुचविलेला पैसा उभारण्याच्या योजनेकडे लक्ष दिलें म्हणजे मात्र बरीच निराशा वाटते. कारण, १४९३ कोटी रुपयांच्या आवश्यक खर्चाची उभारणी जनतेवर जादा कर बसविणें, सरकारनें कर्जें उभारणें व बचतीच्या योजना यशस्वी करणें, मध्य व राज्य सरकारांनीं शिल्लक दाखविणारीं अंदाजपत्रकें तयार करणें या तीन गोष्टींवर आधारण्यांत आली आहे. परंतु आजच्या वाढत जाणाऱ्या महागाईच्या काळांत नवीन करवाढ करणें ही गोष्ट सामान्य जनतेच्या दृष्टीनें अत्यंत जाचक ठरेल. बचतीच्या योजना व सरकारनें कर्जें उभारणें याहि गोष्टी किती प्रमाणांत यशस्वी होऊं शकतात याचा अनुभव गेल्या तीन वर्षांत आलाच आहे. शिल्लक दाखविणारीं अंदाजपत्रकें तयार करणें ही गोष्ट वरील दोन गोष्टींवर अवलंबून असल्यामुळें कितपत शक्य होईल याबद्दल शंका वाटते. ८५ कोटी रुपये जागतिक बँक व इतर राष्ट्रें यांकडून मंडळाच्या अपेक्षेप्रमाणें मिळूं शकतील. परंतु एवढें करूनहि २८७ कोटींची तूट या १४९३ कोटींच्या आवश्यक खर्चात राहातेच, व ही तूट स्टर्लिंग शिलकींतील रकमा उचलून व जरूर तेवढा चलनविस्तार करून भरून काढण्यांत येईल असें सुचविण्यांत आलें आहे. कांहीं झालें तरी कांहींसा चलनविस्तार करावा लागेल असें दिसतें व ही गोष्ट कोणालाहि पटेल असें वाटत नाहीं. स्टर्लिंग शिलकींतुन गेल्या तीन वर्षांप्रमाणें रकम उचलतां येतील कीं काय याबद्दल इंग्लंडच्या अगदी अलिकडे बदललेल्या परिस्थितीमुळें शंका वाटते. नियोजन मंडळाचा हा कच्चा आराखडा आहे. पार्लमेंटमधील चर्चा व इतर व्यक्त होणारें लोकमत यांच्या अनुरोधानें पक्की योजना करतांना कांहीं बदल केले जाणें शक्य आहे. दिल्ली येथें नियोजन मंडळाच्या सल्लागार समितीच्या बैठकींत तज्ज्ञांकडून अनेक व्यावहारिक सूचना करण्यांत आल्या आहेत. तरी योजनेसाठी पैसा उभारण्याच्या कार्यक्रमांत जरूर ते बदल केले जातील अशी अपेक्षा आहे.

योजनेचें बरेंचसें यश वस्तूंचे बाजारभाव निदान स्थिर पातळींत राहण्यावर अवलंबून आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणांत शांतता नांदण्यावर योजनेचें कांहींसें यश अवलंबून आहे. त्याचप्रमाणें, हिंद-पाक संबंध सलोख्याचे राहिल्यास लष्करी खर्च आटोक्यांत राहील व दोनोहि देशांमधील व्यापारी संबंध सुरळीत राहातील. शेतीच्या उत्पन्नाच्या दृष्टीनें अतिवृष्टि किंवा पावसाचा अभाव या दोन गोष्टी होतां कामा नयेत. म्हणजेच, निसर्ग आपणाला अनुकूल राहिला पाहिजे. आंतरराष्ट्रीय राजकारणांत पूर्ण सलोखा नांदला तर औद्योगिक क्षेत्रांत जपान व जर्मनी यांची स्पर्धा जाणवेल व इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया यांचा विक्री मालहि जागतिक बाजारपेठेवर आक्रमण करील. अशा प्रकारची परिस्थितीहि हिंदच्या परराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीनें हितावह ठरणार नाहीं. सारांश, वस्तूंचे बाजारभाव स्थिर राहाणें, आंतरराष्ट्रीय परिस्थितीचें दृढपण, हिंद-पाक संबंध व निसर्गाची कृपा या सर्वांवर कांहीं प्रमाणांत योजनेचें यश अवलंबून राहाणार आहे. या गोष्टी अर्थात आपल्या हातांत नाहींत.

## "उद्यम" नित्योपयोगी वस्तुपाठ विशेषांक

नागपूरच्या "उद्यम" मासिकानें ऑगस्ट, १९५१ चा अंक "नित्योपयोगी वस्तुपाठ विशेषांक" म्हणून काढला आहे. अंकामध्यें प्रथम श्री. शंकरराव किर्लोस्कर व डॉ. वृ. ना. गोडबोले यांच्या मुलाखती, नंतर वस्तुपाठास उपयुक्त अशा प्रास्ताविक स्वरूपाचे एक दोन लेख व त्यानंतर साबण, दंतमंजन, सुगंधी तेलें, सौंदर्यप्रसाधनें, उदबत्त्या, बुटपॉलिश, शालोपयोगी पदार्थ, शोभेची दारू, इत्यादींचे पाठ दिले आहेत. शेवटीं पाठामध्यें उपयोगांत आणल्या गेलेल्या द्रव्यांबद्दल टिपणें जोडलीं आहेत.

शिक्षणाच्या प्रसारामुळें जनतेंत जी जिज्ञासा वाढत आहे तीमुळें नेहमीं लागणाऱ्या वस्तु कशा बनविल्या जातात याची विचारणा वाचकांकडून वाढत्या प्रमाणावर होत आहे व अशी माहिती एकत्र पुरविली जावी या दृष्टीनें हा अंक काढला असल्याचें संपादकांनीं आपल्या निवेदनांत सांगितलें आहे. तो उद्देश यांतील माहितीनें साध्य होईल ह्यांत शंका नाहीं.

अशा माहितीचा उपयोग करून, प्रत्यक्ष वस्तु बनवून अर्थसंपादन करणें हाहि कांहींचा हेतु असतो. त्या दृष्टीनेंहि पाहिल्यास ह्या पाठांतील माहिती बरीच उपयुक्त होईल. बाजारांत आढळणाऱ्या व विशेषतः ख्यातनाम झालेल्या पदार्थांसारखा पदार्थ बनविण्यास प्रत्यक्ष अनुभवाचा पाठिंबा फार लागतो. त्यामुळें सर्वतोपरी समाधानकारक पाठ आयते तयार मिळणें कठीण. उपलब्ध असणारीं कच्चीं द्रव्यें, साधनसामुग्री, ग्राहकांची अभिरुचि, यानुसारहि पाठामध्यें फेरफार करणें आवश्यक असतें. परंतु या अंकांत दिलेले पाठ मार्गदर्शक म्हणून बहुमोल ठरतील हें निःसंशय.

पाठामध्यें वापरलेल्या परिभाषेंत एकसूत्रीपणाचा थोडा अभाव दिसतो. उदाहरणार्थ, "ऑफिस पेस्ट"चें भाषांतर "कार्यालय लेपक" असें केल्यावर "लायब्ररी पेस्ट"चेंहि "ग्रंथालय लेपक" असें व्हावयास हवें होतें. "ऑइल क्लॉथ"ला मेणकापड हा सुटसुटीत व रूढ शब्द वापरणें योग्य झालें असतें. त्याचप्रमाणें टिपणामध्यें कांहीं ठिकाणीं "अम्ल", कांहीं ठिकाणीं "आम्ल" व कांहीं ठिकाणीं "ॲसिड" हे एकाच अर्थाचे शब्द वापरलेले आढळतात. पण हे दोष किरकोळ होत.

अंकाची सजावट चांगली झाली असून मधून मधून दिलेल्या चित्रमय चुटक्यांनीं त्याच्या आकर्षकतेत भर पडली आहे.

हरघडी वापरण्यांत येणाऱ्या वस्तूंबद्दल माहिती देणारा उपयुक्त अंक काढल्याबद्दल वाचक "उद्यम"ला धन्यवाद देतील.

गो. रा. के.

---

**फळांच्या विक्रीसाठी सहकारी संस्था**—फळांच्या विक्रीसाठी सहकारी संस्था कशा प्रकारच्या असाव्या ह्यासंबंधीं रिझर्व्ह बँकेनें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. ह्याविषयीं निरनिराळ्या देशांच्या वाङ्मयाचा अभ्यास करून हें पुस्तक मुद्दाम तयार करण्यांत आलें आहे. हा व्यापार करण्याची पद्धत आणि त्याची द्रव्यविषयक व्यवस्था ह्यांची माहिती पुस्तकांत देण्यांत आली आहे.

**बँकेचे दरवाजे तात्पुरते बंद**—दि ॲग्रिकल्चरल ॲंड इंडस्ट्रिअल बँक लि. ह्या बँकेनें ता. १७ ऑगस्टपासून आपले व्यवहार तात्पुरते बंद ठेवले आहेत. बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस कुंदापूर (दक्षिण कॅनरा) येथें आणि मध्यवर्ती कचेरी कारवार जिल्ह्यांतील कुमठा ह्या ठिकाणीं आहे.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,१९,४८५
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. म. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.



पुणें जिल्हा सहकारी
खरेदी विक्री संघ लि.

४१२ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनकोसोप. टेलिफोन नं. ३११९

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.



फोनः ३४५११. ताः SAHYOG

दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल
को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.



—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—साड्यांचें माहेरघर—

खादी मन्दिर

२६१, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

## कामगारांचा स्वाभिमान राखण्याचा कारखानदारांचा निश्चय

### येण्या-जाण्याची नोंद करण्याची पद्धति

कामगारांची प्रतिष्ठा राखण्यासाठी पार्कर पेन कंपनीच्या जेम्सव्हिले (अमेरिका) येथील कारखान्यांत, जाण्या-येण्याच्या वेळेची पत्रिकेवर कामगारांनीं स्वतः नोंद करण्याची पद्धति बंद करण्यांत आली आहे. अनेक दिवस निरीक्षण करून, कंपनीच्या उपाध्यक्षांनीं असें ठरविलें कीं, या प्रथेमुळें कामगारांचें मन दुखावतें म्हणून ही पद्धत बंद करावी. आतां, या कारखान्यांतील कामगारांच्या येण्या-जाण्याच्या वेळेची नोंद देखरेख करणारा स्वतःच करतो. रांगेंत उभें राहून वेळेची नोंद करण्याचा कामगारांचा त्रास कमी झाला आहे.

या निर्णयाचें कामगारांनीं व त्यांच्या संघटनांनीं चांगलेंच स्वागत केलें. कामगारांचा वेळ वांचतो व त्यांचीं मनें साफ राहातात. यामुळें कंपनीचाहि फायदा होतो. उत्पादनाला धक्का न पोंचता, कामगारांची प्रतिष्ठा राखण्यासाठी जें कांहीं करणें शक्य आहे तें केलें पाहिजे, असें कंपनीच्या उपाध्यक्षांचें सांगणें आहे.

### इस्टेट ड्यूटी बिलास एवढा विलंब कां लागला?

एस्टेट ड्यूटी बसविण्यास बहुतेक राज्य सरकारांची संमति आहे. शेतीच्या जमिनींचे बाबत एस्टेट ड्यूटी बसविण्यास मध्यवर्ती सरकारास अधिकार देण्याविषयीं राज्य सरकारांशीं केंद्रीय सरकारचा पत्रव्यवहार कांहीं काळ चालू आहे. एस्टेट ड्यूटीचें पाहिलें बिल लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत ३१ मार्च, १९४६ रोजीं मांडण्यांत आलें. परंतु, घटनात्मक फरकांमुळें तें बिल लॅप्स झालें. नवें बिल कॉन्स्टिट्युअंट असेंब्ली (लेजिस्लेटिव्ह) मध्यें २२ मार्च, १९४८ रोजीं नव्यानें मांडण्यांत आलें. ६ एप्रिल, १९४८ रोजीं बिल सिलेक्ट कमिटीकडे सोंपविण्यांत आलें, परंतु तिचा रिपोर्ट ३१ मार्च, १९४९ पर्यंत तयारच झाला नाहीं. सिलेक्ट कमिटीनें दुरुस्त केलेलें बिल विचारांत घ्यावें, ह्या सूचनेस २१ डिसेंबर, १९४९ रोजीं एका बिन-सरकारी सभासदानें दुरुस्ती सुचविली आणि १९५० च्या अंदाजपत्रकी बैठकीपर्यंत बिलाचा विचार तहकूब झाला. १९५० मध्यें बिल विचारांत घेतां आलें नाहीं. कारण, मुख्यतः हिंदु कोड बिल मंजूर झाल्यावरच बिलाचा विचार होणें योग्य होईल असें मत पडलें. हिंदुकोड बिलांतील तरतुदींमुळें वारसा व एकत्र-कुटुंब-पद्धति ह्यांत बराच फेरफार होणार असून एस्टेट ड्यूटी कशी बसवावी हें त्यावर अवलंबून रहाणार आहे.

### कुंडल विणकर उत्पादन सहकारी मंडळी लि.

अहवालाचे वर्षी मंडळीचें शेअर भांडवल २,३६२ रु. नीं वाढून तें ४,५२७ रु. झालें. रिझर्व्ह फंड १,१९४ रु. असून इमारत फंड ६४६ रु. आहे. संस्थेकडे १५५ मागांचे सूतवाटपाचें काम आहे. आतां नवीन खानेसुमारीप्रमाणें २२५ हातमागांची नोंद झाली आहे. सोसायटीनें ३५ हजार रु. ची सूत विक्री करून निव्वळ नफा २८० रु. मिळविला. संस्थेमार्फत मालाचें उत्पादन वाढविण्यासाठी थोडे माग आणून प्रयत्न करणें, रंगणीचा कारखाना चालू करणें, भांडवलाची तरतूद करणें, सरकारी मदत मिळविणें, सभासदांच्या पक्क्या व कच्च्या मालावर कर्ज मिळण्याची व्यवस्था करणें, वगैरेसंबंधीं प्राथमिक विचार कार्यकारी मंडळापुढें आहे. सोसायटीस 'अ' वर्ग मिळालेला आहे. (चेअरमनः धोंडीराम साधू तारळेकर. सेक्रेटरीः धोंडिबा सिताराम खारगे.)

## बँकांच्या तपासणीची उपयुक्तता सिद्ध झाली

### रिझर्व्ह बँकेचा ३०-६-५१ अखेरचा रिपोर्ट

"आपल्या बँकिंगच्या पद्धतींतील कांहीं दोषांचें मूळ गेल्या महायुद्धांत मिळालेला विपुल पैसा व बँकेच्या व्यवहाराचा कोणत्याही प्रकारचा अनुभव नसलेल्या व्यक्तींनीं स्वतःच्या अगर आपल्या मित्रांचे खास हितसंबंध असलेल्या धंद्यांस आर्थिक साह्य करण्याच्या हेतूनें सुरू केलेल्या अनेक बँका, यामध्यें आढळतें. बँकांच्या पद्धतशीर व वारंवार तपासणीनेंच बँकांच्या अशा अकार्यक्षम पद्धतींत व व्यवहारांत वेळींच सुधारणा करतां येईल. या वर्षांत पंजाब नॅशनल बँकेंत अंशतः विलीन झालेली भारत बँक व पश्चिम बंगालमधील चार शेड्युल्ड बँकांचें एकत्रीकरण झाल्यानंतर घडलेल्या घटनांवरून अशा तपासणीची उपयुक्तता सिद्ध झाली आहे. या विलिनीकरणामुळें पश्चिम बंगाल व उत्तर भारतामधील बँकांच्या व्यवहारांतील मोठमोठे घोटाळे टळले आहेत. पंजाब नॅशनल बँकेंत विलीन झालेल्या भारत बँक लि. च्या पैशाचा तरतेपणा असमाधानकारक नसून, या बँकेचीं येणीं नजिकच्या काळांत वसूल होण्याजोगी नसली तरी बाहेरील एकूण देण्यापेक्षां अधिक होतीं. परंतु तिच्या कारभाराची पद्धति, कर्जमंजूरीची पद्धति, वगैरेमुळें फार गंभीर परिस्थिति निर्माण झाली असती, असें तपासणीअंतीं दिसून आलें. विलिनीकरणामुळें हा संभाव्य धोका टळला. बँकेच्या तपासणीच्या अधिकाराच्या सदुपयोगाची या वर्षांतील आणखी ठळक घटना म्हणजे पश्चिम बंगालमध्यें बंगाल सेंट्रल बँक लि., दि. कोमिल्ला युनियन बँक लि., दि. कोमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशन लि. आणि हुगळी बँक लि. या चार बँकांचें एकत्रीकरण ही होय. एकत्रीकरणानंतर अवघ्या ५ महिन्यांच्या अल्पावधींत बँकेच्या ठेवाच्या रकमेंत २ कोटी रुपयांहून अधिक वाढ झाली आणि खेळत्या भांडवलांत (लिक्विड रिसोर्सेस) ३ कोटींनी वाढ झाली.

"अनेक बाबतींत एकत्रीकरण आवश्यक असलें तरी कोणत्याही विलिनीकरणाच्या सूचनेस पडणाऱ्या कांहीं कायदेशीर व व्यावहारिक मर्यादांमुळें तो सर्व ठिकाणीं लागू होणारा उपाय नव्हे. ही पद्धत भक्कम पायावर उभ्या असलेल्या बँकेच्या बाबतींत, अगर लोकांकडून यावयाचा पैसा बाहेरील देण्याइतका असूनही कांहीं आकस्मिक परिस्थितीमुळें अडचणींत येण्याची शक्यता असलेल्या अगर दिलेला पैसा वाजवी काळांत परत मिळणें शक्य नसलेल्या बँकेच्या बाबतींतच व्यवहार्य होऊं शकेल. रिझर्व्ह बँकेनें बँकांची पद्धतशीर व वारंवार तपासणी केल्यानेंच बँकांच्या अकार्यक्षम पद्धतींत व व्यवहारांत वेळींच सुधारणा करतां येईल. अमेरिकेंत कोठल्याही तऱ्हेची बँक असो, तेथें तपासणीची कार्यक्षम पद्धति असतेच; त्यामुळें अमेरिकेंतील बँकांचा दर्जा मोठ्या प्रमाणावर वाढत आहे."

### रिझर्व्ह बँकेचा ८·३४ कोटी रुपये नफा सरकारला मिळणार

३० जून १९५१ ला संपलेल्या वर्षांत रिझर्व्ह बँकेस ११·४० कोटी रुपये उत्पन्न होऊन ३·०६ कोटी रु. खर्च झाला. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्टाच्या ४७ व्या कलमानुसार मध्यवर्ती सरकारला ८·३४ कोटी रुपये नफा मिळणार आहे. गेल्या वर्षी हाच आंकडा ९·९१ कोटी रुपये असा होता.

हें पत्र पुणें, पेठ मावळा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.